आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

२३ ऑक्टोबर २०२४ - बुधवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- विधानसभा निवडणुकीसाठी उद्धव ठाकरेंकडून ६५ उमेदवारांची यादी जाहीर, राष्ट्रवादी काँग्रेसचे ३८, शिवसेनेचे ४५ उमेदवार जाहीर
- मुख्यमंत्री एकनाथ शिंदे ठाणे-पाचपाखडीतून, अजित पवार बारामतीमधून, अमित ठाकरे माहिममधून निवडणूक लढवणार
- विविध पक्षांमध्ये आजही आजी - माजी नेत्यांचे पक्ष प्रवेश

  **आणि**

- राज्यात सोन्याचे दर तोळ्यामागे ८० हजारांच्या पुढे, चांदीही किलोमागे १ लाख रुपये

**<><><><><>**

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षानं आज ६५ उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली. त्यात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याविरोधात कोपरी-पाचपाखाडी मतदारसंघात केदार दिघे यांना रिंगणात उतरवलं आहे. ठाण्यातून राजन विचारे, दिंडोशीतून सुनील प्रभू, अंधेरी पूर्वमधून ऋतुजा लटके, तर वरळीतून आदित्य ठाकरे निवडणुकीच्या रिंगणात असतील. गुहागरमधून भास्कर जाधव, वांद्रे पूर्वमधून वरूण सरदेसाई, कुडाळमधून वैभव नाईक, तर राजापूरमधून राजन साळवी निवडणूक लढवणार आहेत. नेवासामधून शंकरराव गडाख, बार्शीतून दिलीप सोपल, सावंतवाडीतून राजन तेली, राधानगरीतू के. पी. पाटील आणि शाहुवाडीतून सत्यजित पाटील यांना उमेदवारी जाहीर झाली आहे.

माहिममधून मनसेचे अमित ठाकरे यांच्या विरोधात उद्धव ठाकरे यांच्याकडून महेश सावंत उमेदवार आहेत. शिवसेनेकडून तिथून सदा सरवणकर रिंगणात आहेत.

**<><><><><>**

विधानसभा निवडणुकीसाठीच्या राजकीय हालचालींना वेग आला आहे. महायुती आणि महाविकास आघाडीच्या जागावाटपाच्या वाटाघाटी शेवटच्या टप्प्यात आहे. महाविकास आघाडीचं जागावाटप आज अंतिम होईल, असा विश्वास विधानसभेतले विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी आज व्यक्त केला.

**राष्ट्रवादी काँग्रेस** पक्षानं ३८ उमेदवारांची पहिली यादी आज जाहीर केली. उपमुख्यमंत्री आणि पक्षाचे अध्यक्ष अजित पवार बारामती विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढवणार आहेत. छगन भुजबळ येवल्यातून, दिलीप वळसे पाटील आंबेगाव इथून, हसन मुश्रीफ कागलमधून, तर धनंजय मुंडे परळी विधानसभा मतदारसंघातून निवडणुकीच्या रिंगणात आहेत. विधानसभेचे उपाध्यक्ष नरहरी झिरवाळ यांना दिंडोरीतून, धर्मराव आत्राम यांना अहेरीतून, तर अदिती तटकरे यांना श्रीवर्धन इथून राष्ट्रवादीनं उमेदवारी जाहीर केली आहे.

**शिवसेनेनं** काल रात्री ४५ उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे पुन्हा एकदा कोपरी-पाचपाखाडी मतदारसंघातून निवडणुकीच्या रिंगणात उतरणार आहेत. उदय सामंत रत्नागिरीतून, तर दीपक केसरकर सावंतवाडीतून निवडणूक लढवणार आहेत. सुहास कांदे यांना नांदगाव विधानसभा मतदारसंघातून, प्रताप सरनाईक यांना ओवळा-माजीवड्यातून, तर दादाजी भुसे यांना मालेगाव बाह्य मतदारसंघातून शिवसेनेनं उमेदवारी दिली आहे.

**महाराष्ट्र नवनिर्माण सेनेनंही** ४५ उमेदवारांची दुसरी यादी काल प्रसिद्ध केली.

महाविकास आघाडीचा भाग असलेल्या **शेतकरी कामगार पक्षानंही** काल, अलिबाग, पनवेल, उरण, पेण आणि सांगोला या पाच जागांवर उमेदवारांची घोषणा

केली. **भारतीय कम्युनिस्ट पक्षानं** शीव-कोळीवाडा मतदारसंघातून विजय दळवी यांना उमेदवारी दिली आहे.

**<><><><><>**

राज्यात संभाजी ब्रिगेड स्वबळावर निवडणूक लढणार असून पन्नासपेक्षा अधिक उमेदवार देणार असल्याची माहिती ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष मनोज आखरे आणि मुख्य प्रवक्ते डॉक्टर गंगाधर बनबरे यांनी आज पुण्यात पत्रकार परिषदेत दिली. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षानं संभाजी ब्रिगेडला त्यांच्या कोट्यातून किमान ४ ते ५ जागा देण्याचं आश्वासन दिलं होतं, परंतु आश्वासनानुसार जागा दिल्या नसल्याचा आरोप आखरे यांनी केला.

**<><><><><>**

माजी मंत्री, भाजपा नेते  लक्ष्मण ढोबळे यांनी आज राष्ट्रवादी काँग्रेस शरच्चंद्र पवार पक्षात प्रवेश केला. पक्षाच्या कार्याध्यक्ष सुप्रिया सुळे यांनी त्यांचं पक्षात स्वागत केलं. ढोबळे पक्षात आल्याने त्यांच्या अनुभवाचा फायदा पक्षबांधणीसाठी होईल, असं सुळे यावेळी म्हणाल्या. तर आपण अजित पवार यांच्याशी मतभेद झाल्याने पक्ष सोडला होता, आता ते या पक्षात नसल्याने पुन्हा पक्षाशी जोडले गेल्याचं ढोबळे यांनी सांगितलं.

**<><><><><>**

अमरावती विधानसभा मतदारसंघाच्या काँग्रेसच्या आमदार सुलभा खोडके, येवला मतदारसंघाचे माजी आमदार कल्याणराव पाटील यांनी आज राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी त्यांचं पक्षात स्वागत केलं.

त्यानंतर सुलभा खोडके यांना अमरावती विधानसभा मतदारसंघातून उमेदवारी जाहीर करण्यात आली.

**<><><><><>**

राज्यात होणाऱ्या विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर विविध पक्षाचे उमेदवार अर्ज भरत आहेत.

**मुंबईत** मागाठाणे आणि जोगेश्वरी पूर्व अशा दोनच मतदारसंघातून आज उमेदवारी अर्ज दाखल झाले.

**परभणी** विधानसभा निवडणुकीसाठी आज दुसऱ्या दिवशी ४ विधानसभा मतदार संघात ९ उमेदवारांनी अर्ज दाखल केले आहेत.

**जालना** जिल्ह्यात आज तीन उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत. **लातूर** जिल्ह्यातल्या उदगीर मतदारसंघातून २ अर्ज दाखल झाले आहेत. जिल्ह्यातल्या लातूर शहर, ग्रामीण, निलंगा आणि औसा विधानसभा मतदारसंघातून अद्याप एकाही उमेदवाराने अर्ज दाखल केलेला नाही.

**धाराशिव** जिल्ह्यात तसंच धुळे जिल्ह्यात आज एकाही उमेदवाराने अर्ज दाखल केलेला नाही. नांदेड जिल्ह्यात आज किनवट आणि नांदेड उत्तर विधानसभा मतदारसंघांत प्रत्येकी एका उमेदवाराने अर्ज दाखल केला आहे.

**हिंगोली** जिल्ह्यात आज १२३ अर्जांची उचल झाली असून वसमत विधानसभा मतदारसंघात जगन्नाथ अडकिने यांनी आपला उमेदवारी अर्ज भरला आहे.

**गडचिरोली** जिल्ह्यातल्या अहेरी विधानसभा मतदारसंघातून अजय आत्राम यांनी अपक्ष म्हणून अर्ज दाखल केला आहे. काल दीपक आत्राम या अन्य अपक्ष उमेदवाराचा अर्ज दाखल झाला होता.

दरम्यान, राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे कोपरी पाचपाखाडी मतदारसंघातून आपला उमेदवारी अर्ज २८ ऑक्टोबर रोजी दाखल करतील.

**<><><><><>**

विधानसभा निवडणुकीच्या कामात हलगर्जीपणा केल्याप्रकरणी बीडमध्ये दोन कर्मचाऱ्यांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अक्षय भागवत आणि अकबर पटेल अशी त्यांची नावे आहेत.

**<><><><><>**

आताच हाती आलेल्या बातमीनुसार.

महाविकास आघाडीतले तिनही पक्ष प्रत्येकी ८५ जागा लढवणार आहे. काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष या पक्षांना या जागा मिळाल्या आहेत. उरलेल्या जागा मित्र पक्ष लढवणार आहेत, असं तिन्ही पक्षाच्या नेत्यांनी नुकत्याच झालेल्या पत्रकार परिषदेत जाहीर केलं.

**<><><><><>**

श्रोते हो, विधानसभा निवडणुकीच्या निमित्तानं ‘आढावा विधानसभा मतदारसंघांचा’ हा कार्यक्रम दररोज संध्याकाळी ७ वाजून १० मिनिटांनी अस्मिता वाहिनीसह प्रादेशिक वृत्त विभागाच्या Youtube वरुन प्रसारित केला जात आहे. या

कार्यक्रमात आज **पालघर** जिल्ह्यातल्या मतदारसंघांचा आढावा आपल्याला ऐकता येईल.

**<><><><><>**

राज्यात तोळ्यामागे सोन्याचे दर तोळ्यामागे ८० हजारांच्या पुढे गेले असून चांदी किलोमागे १ लाख रुपये झाली आहे. कालच्या तुलनेत सोनं-चांदी आज सुमारे ४००-५०० रुपयांनी महागलं. २४ कॅरेट सोनं जीएसटी शिवाय ७८ हजार ७०० रुपये तोळा आणि २२ कॅरेट सोन्याचे व्यवहार ७८ हजार ४०० रुपये दराने होत होते. चांदीचे व्यवहार ९८ हजार ८६२ रुपये किलो दरानं होत होते.

दिवाळी आणि लग्नसराईमुळं ही दरवाढ होते आहे. याशिवाय आंतरराष्ट्रीय बाजारातले चढ-उतार, महागाईचे दबाव आणि जागतिक राजकीय तणाव यांसारख्या आर्थिक घटकांचाही सोन्याच्या दरांवर प्रभाव पडतो आहे.

**<><><><><>**

साहित्य संमेलनाचा अध्यक्ष स्त्री आहे की पुरुष याचा संबंध नाही, अध्यक्षपदासाठी व्यक्ती लायक आहे की नाही हे बघितलं गेलं पाहिजे, असं स्पष्ट मत साहित्य संमेलनाच्या नियोजित अध्यक्षा डॉक्टर तारा भवाळकर यांनी आज पुण्यात व्यक्त केलं. दिल्ली इथं होणाऱ्या 98व्या साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल डॉक्टर भवाळकर यांचा महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे, अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळ, मुंबई आणि सरहद, पुणे यांच्यातर्फे आज जाहीर सत्कार करण्यात आला. मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळाला ही आनंदाची बाब असली तरी मराठी माणसांनी मराठी भाषा बोलली, लिहिली आणि वाचल्याशिवाय मराठी भाषा टिकणार नाही असंही भवाळकर यांनी सांगितलं.

**<><><><><>**

जळगाव जिल्ह्यात विधानसभा सार्वत्रिक निवडणूकच्या अनुषंगानं पोलीस अधीक्षक डॉ.महेश्वर रेड्डी यांनी ऑपरेशन ऑल आऊट/ कोंबिंग नाकाबंदी करून रोख रक्कम १ कोटी ४५ लाख रुपये जप्त केले.

**<><><><><>**

विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने धुळे पोलिसांनी ६ पिस्तुलं, ८ जिवंत काडतुसं, १६ तलवारी, १ कोयता, गुप्ती अशी घातक शस्त्रे आणि अन्य वस्तू जप्त केल्या. पोलिसांनी १७ फरार आरोपींना अटक केली असून २४ लाखांचा बेकायदेशीर मद्यसाठा देखील जप्त करण्यात आला आहे.